# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल


**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.comWebsite : http://jdhepanvel.org दूरध्वनी व फॅक्सांबर (०२२) २७४५ ३८२०.


**क्र. विससं/उशि/कोविप/वेतन/प्राचार्य/२०२१/1007** **दिनांक :१७.०५.२०२१**

**कार्यालयीन आदेश**

**प्रति,**

**प्राचार्य,**
**सर्व अधिनस्थ अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य,**
**विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, जि. ठाणे**
**पालघर, रायगड, रत्नागिरी, व सिंधुदूर्ग -**

विषय :- मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र. ६३४/२०१६
महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल्स असोसिएशन ऑफ नॉन - गव्हर्नमेंट कॉलेजेस विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर ...

संदर्भ :-१. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक न्यायाप्र-२०१७/प्र.क्र.३९७/१७/विशी-११ दि. ०५ मे, २०२१

२.मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण पुणे यांचे आदेश क्र. युएनआय/संकिर्ण/वेतनश्रेणी/६३४/२०१६/६४५६, दिनांक १०.०५.२०२१

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल्स असोसिएशन ऑफ नॉन - गव्हर्नमेंट कॉलेजेस यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ६३४/२०१६ दाखल करुन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. ३०.०६.२०१० च्या अधिसुचनेतील तरतूदीप्रमाणे दिनांक ०१ जानेवारी २००६ रोजी किंवा त्यानंतर प्राचार्य पदावर सरळसेवेने / थेट नियुक्ती झालेल्या (Directly recruited) वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्याची ६ व्या वेतन आयोगातील वेतनबॅड रु. ३७४००-६७००० व ॲकॅडमिक ग्रेड वेतन रु. १००००/- या वेतनसंरचनेत रु. ४३०००/- इतक्या किमान वेतनावर वेतननिश्चिती करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण पुणे यांचे संदर्भीय पत्र क्र.२ नुसार पात्र प्राचार्याना देय ठरणारी रक्कम अदा करण्याबाबत कळविलेले आहे.

या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयातील संदर्भीय शासन निर्णयानुसार पात्र प्राचार्यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांची सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन निश्चिती साठी प्रकरणे सादर करण्यात यावे.

**या कार्यालयाने वेतन निश्चिती मान्य केल्यानंतर त्याची लेखाअधिकारी, उच्च शिक्षण कोकण विभाग, पनवेल यांचे कडून त्यांची पडताळणी केल्यानंतरच फरकाचे विवरण सादर करावे.**

**(डॉ. संजय जगताप)**
**विभागीय सहसंचालक**
**उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल**

प्रत:- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर

Scanned by CamScanner

विभागाच्या अधिनस्त असलेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य पदाच्या वेतनश्रेणीबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः न्यायाप्र-२०१७/प्र.क्र.३९७/१७/विशि-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख:- ०५ मे, २०२१

वाचा:-

१. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे पत्र क्र.१-३२/२००६-U-II/UJ (i) दि.३१.१२.२००८
२. उच्च व तंत्र शिक्षण शासन निर्णय क्र. एनजीसी-२००९/(२४३/०९)/विशि-१, दि.१२.०८.२००९
३. विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र.F-३.१/२००९/ दि.३०.०६.२०१०
४. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे पत्र क्र.१ ३६/२००९-U.II, दि.२६.०८.२०१०
५. विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्र.F.२२-६ (Bom/Nag) २०१६ (L), दि.२०.१०.२०१७

प्रस्तावना :-

संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने सहाव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनसंरचना दि.३१.१२.२००८ च्या आदेशान्वये लागू केल्या. त्यामध्ये प्राचार्य पदाची वेतनसंरचना वेतनबँड रू.३७,४००-६७,००० अधिक अकॅडमिक ग्रेड वेतन रू.१०,०००/- असे आहे. केंद्रीय मुनष्यबळ विकास मंत्रालयाच्या शिफारशीनुसार राज्य शासनाने संदर्भ क्र.२ येथील दि.१२.०८.२००९ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांना सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनसंरचना लागू केल्या आहेत. त्यामध्ये प्राचार्य पदाची वेतनसंचना वेतनबँड रू.३७,४००-६७,००० अधिक अकॅडमिक ग्रेड वेतन रू.१०,०००/- अशी आहे.

२. विद्यापीठ अनुदान आयोगाने संदर्भ क्र.३ येथील दि.३० जून, २०१० रोजीच्या अधिसूचनेन्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक सकमक्ष पदांच्या शैक्षणिक अर्हता पात्रता, अनुभव व इतर सेवाशर्ती विहित केलेल्या आहेत. त्यामध्ये प्राचार्य पदाची वेतननिश्चिती किमान रू.४३०००/- इतक्या वेतनावर करण्याबाबत तरतुद केलेली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.३० जून, २०१० च्या अधिसूचनेतील तरतुदी राज्य शासनाने शासन निर्णय दि.१५ फेब्रुवारी, २०११ अन्वये स्वीकृत केलेल्या आहेत. त्यामध्ये प्राचार्य पदाचे किमान वेतन रू.४३,०००/- इतके करण्याची बाब शासनावर वाढीव आर्थिक भार निर्माण करणारी असल्याने ती समाविष्ट न करता त्याबाबत स्वतंत्रपणे वित्त विभागाच्या सहमतीने निर्णय घेण्यात येईल असे प्रस्तावित करण्यात आले होते. संदर्भ क्र.४ येथील केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने दि.२६.०८.२०१० च्या पत्रान्वये सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या प्राचार्य पदास किमान वेतन रू.४३,०००/- करण्यात यावे असा निर्णय घेतलेला आहे.

३. महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल्स असोसिएशन ऑफ नॉन गव्हर्नमेंटल कॉलेजस यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.६३४/२०१६ दाखल करून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.३०.०६.२०१० च्या अधिसूचनेतील तरतुदीप्रमाणे महाविद्यालयीन प्राचार्य पदाची रू.३७४००-६७००० व एजीपी रू.१००००/- या वेतनश्रेणीमध्ये रू.४३०००/- या वेतनावर वेतननिश्चिती करून त्याप्रमाणे लाभ अनुज्ञेय करण्याची मागणी केली. सदरहू याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.०६.०९.२०१९ याचिकाकर्ते यांच्या बाजूने निर्णय देऊन निकाली काढली आहे.

४. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन सहाव्या वेतन आयोगामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य पदाची रू.३७४००-६७००० व एजीपी १०००० या वेतन संरचनेमध्ये रू.४३०००/- इतक्या वेतनावर वेतन निश्चिती करण्यास मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव मा. मंत्रिमंडळाच्या दि.२४.०३.२०२१ रोजीच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आला. मा.

Scanned by CamScanner

मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार यासंदर्भात सविस्तर शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

१. प्रस्तावनेत नमूद बाबी विचारात घेऊन शासन या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

१. दिनांक ०१ जानेवारी, २००६ रोजी अथवा तद्नंतर प्राचार्य पदावर सरळसेवेने/थेट नियुक्त झालेल्या (Directly recruited) वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांची ६ व्या वेतन आयोगातील वेतनबँड रू.३७४००-६७००० व अकॅडमिक ग्रेड वेतन रू.१०००० या वेतनसंरचनेत रू.४३०००/- इतक्या वेतनावर वेतननिश्चिती करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. तद्नुषंगाने संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी पात्र प्राचार्यांना देय ठरणाऱ्या रकमेची अचूक परिगणना करून अनुज्ञेय लाभ संबंधितांना अदा करण्यात यावेत.

३. यासाठी होणाऱ्या रू.४२,८९,९६,८७६/- (अक्षरी रूपये बेचाळीस कोटी एकोनव्वद लक्ष शहाण्णव हजार आठशे शहात्तर फक्त) एवढ्या खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

४. यासाठी होणारा खर्च हा वेतनावरील खर्च ज्या लेखाशीर्षातून केला जातो, त्याच लेखाशीर्षातून भागविण्यात यावा. तसेच आवश्यकतेनुसार निधी अर्थसंकल्पित करून घेण्याची कार्यवाही संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी करण्यात यावी.

२. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२९७/२०२०/सेवा-९, दि.१५.१२.२०२० अन्वये दिलेल्या सहमतीने व मा.मंत्रिमंडळाने दि.२४.०३.२०२१ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२१०५१०१३११२३७००८ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT MADHUKARRAO BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=HIGHER AND TECHNICAL DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=880d8eb755bcb4455fa360baaa8797820b6265d75275a72f9fa31977bfeff4c9, serialNumber=99eb928028df71ebdfcd2898e209d499192ad3899251ead42f7d38a3141ab69, cn=AJIT MADHUKARRAO BAWISKAR
Date: 2021.05.10 13:21:29 +05'30'

**(अजित बाविस्कर)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. विधानसभा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, यांचे स्वीय सहायक, विधानभवन, मुंबई,
४. मा. विधानसभा उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, यांचे स्वीय सहायक, विधानभवन, मुंबई,
५. मा. सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, यांचे स्वीय सहायक, विधानभवन, मुंबई,
६. मा. उपसभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, यांचे स्वीय सहायक, विधानभवन, मुंबई,
७. मा. कुलगुरू, सर्व अकृषि विद्यापीठे,
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई-१, महाराष्ट्र,
९. महालेखापाल (लेखा परीक्षा) मुंबई-१, महाराष्ट्र,
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) नागपूर-२, महाराष्ट्र,



Scanned by CamScanner